सकाळ
सिंधुदुर्ग, बुधवार,
१ एप्रिल २०१५
२

# पर्यावरण संवर्धन नैतिक जबाबदारी

## डॉ. मधुकर बाचुळकर : दोडामार्ग येथे मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. ३१ : 'जगाच्या एकूण दोन तृतीयांश जैवविविधता ही केवळ १७ देशांत उपलब्ध आहे. भारत हा त्यातील एक प्रमुख देश आहे. जगातील एकूण वनस्पतींपैकी ७.१ टक्के वनस्पती व ६.४ टक्के प्राणी भारतात उपलब्ध आहेत. भारतातील पश्चिम घाटात विविध प्राणी, वनस्पती, आज दुर्मिळ होत चालल्या आहेत. विकासाच्या नावाखाली अमाप जंगलतोड, नैसर्गिक अधिवास नष्ट केले जात आहेत. पर्यावरणातील प्रत्येक घटक हा मानवी उत्क्रांतीसाठी महत्त्वपूर्ण असतो. म्हणून त्याचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकांची नैतिक जबाबदारी आहे,' असे मत विजयसिंह यादव महाविद्यालयाचे प्राचार्य व माधव गाडगीळ समितीचे सदस्य डॉ. मधुकर बाचुळकर यांनी मांडले.

ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'पश्चिम घाट जागतिक वारसा : पर्यावरण आणि विकास' या विषयावर नुकत्याच झालेल्या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आर. बी. पाटील होते.

डॉ. बाचुळकर पुढे म्हणाले, ''जगातील फक्त २० टक्के जैवविविधतेचा आजपर्यंत शोध लागला आहे. ८० टक्के जैवविविधता अजूनही विज्ञानाच्या दृष्टिक्षेपात आलेली नाही. पर्यावरण संवर्धनाबाबत राज्यकर्ते आणि प्रशासन उदासिन आहे. महाराष्ट्रात फक्त २ राष्ट्रीय उद्याने, ९ अभयारण्ये आणि १ व्याघ्र प्रकल्प आहे. त्याकडेही हवे तसे लक्ष दिले जात नाही. लोकांची दिशाभूल करून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने जैवविविधतेचे संवर्धन केले पाहिजे. ती प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.''

या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रातील दुसऱ्या दिवशी पश्चिम घाटातील पर्यटन विकास, पर्यटन विकासातील समस्या व पश्चिम घाटातील जल व्यवस्थापन या विषयावर वेगवेगळ्या राज्यांतून आलेल्या तज्ज्ञांनी आपले शोध निबंध सादर केले.

समारोपास प्राचार्य व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे चर्चासत्र पूर्णपणे यशस्वी झाल्याचे मनोगत उपस्थितांनी व्यक्त केले. समारंभाचे सूत्रसंचालन या चर्चासत्राचे सहसमन्वयक प्रा. सोपान जाधव यांनी केले. चर्चासत्राचे समन्वयक डॉ. पी. डी. गाथाडे यांनी आभार मानले.